१३ वा वित्त आयोग जिल्हा नाविन्यपूर्ण योजना निधी वितरण करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्र. डिएपी २०१७ /प्र.क्र .९० /१४८१-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१९.

वाचा -

१) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.वित्त आयोग-११/प्र.क्र.४२/का.१४८१-अ, दि.४ डिसेंबर, २०१२.

२) शासन पत्र क्र. डिएपी- २०१७ /प्र.क्र .९० /१४८१-अ , दि. २२ फेब्रुवारी, २०१९

प्रस्तावना -

जिल्हा नाविन्यपूर्ण निधी ही योजना १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून राज्यातील प्रत्येक जिल्हयांना जिल्हा नाविन्यपूर्ण योजनेसाठी सन २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रत्येक प्रतिवर्ष रु.२० लक्ष याप्रमाणे ५ वर्षाकरीता १.०० कोटी प्रमाणे रु.३५ कोटी निधी उपलब्ध होणे आवश्यक होते. लोकसहभाग १० % व शासन हिस्सा ९० % या प्रमाणे योजना आहे. स्थानिक पायाभूत सुविधांमधील तफावत भरुन काढण्यासाठी आणि विद्यमान निधीतून/ स्त्रोतांव्दारे ज्या कामांसाठी निधी मिळत नाही, त्यासाठी या निधीचा विनियोग करावयाचा असून, या योजनेअंतर्गत पहिला हप्ता रु.१७५० लाख दि.२९.४.२०१३ रोजी केंद्र शासनाने मुक्त केला आहे.

जिल्हा नाविन्यपूर्ण योजनेसाठी वितरीत करण्यात आलेल्या रु.१७५०.०० लाख निधीच्या अनुषंगाने सर्व संबंधित जिल्हयांकडून प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रानूसार एकुण खर्च रु.१३२७.१८ लाख इतका असून रु.४२२.८२ लाख समर्पित आहेत.रु.१३२७.१८ लाख इतक्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र दि.१७.११.२०१७ च्या पत्रान्वये वित्त विभागास सादर करण्यात आले आहे. सदर उर्वरित निधी केंद्र शासनास परत न करता त्याचे राज्यासाठी केंद्राच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खर्ची पडावा याकरिता , सदर निधी खर्च करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१३ व्या वित्त आयोगाअंतर्गत जिल्हा नाविन्यपूर्ण योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी सन २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी, केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त झालेल्या निधीतून ९० टक्के शासनाचा सहभाग असलेला निधी उपरोक्त क्र. २ येथील पत्रान्वये मंजूर केलेल्या कामांसाठी खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे. उच्च स्तर समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावाची यादी उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आली आहे.

१३ वा वित्त आयोगांतर्गत जिल्हा नाविन्यपूर्ण योजना			
अ.क्र.	जिल्हा	पात्र प्रस्तावांनूसार शिल्लक रकमेच्या तुलनेत पात्र प्रस्तावांची संख्या	पात्र प्रस्तावातील शिल्लक रकमेच्या तुलनेत शासन सहभाग (९०%) रक्कम (रु.लाखात)
१	कोल्हापूर	१	३६.००
२	सांगली	६	५७.१२
३	नाशिक	३	५४.६९
४	जळगाव	४	३६.००
५	हिंगोली	६	१४.६४
६	जालना	१	४५.००
७	बीड	४	१०.८
८	लातूर	४	४४.५५
९	चंद्रपूर	३	२६.८५
१०	गडचिरोली	४	१९.३७
११	अमरावती	१	१६.६९
१२	बुलढ़ाणा	४	३६.००
१३	वाशिम	२	२३.१९
	एकूण	४३	४२०.९

२. शासनाचा सहभाग असलेला ९० टक्के निधी वितरीत करण्यापूर्वी १० टक्के लोकसहभाग/अशासकीय संस्थांचा १० टक्के हिस्सा जिल्हाधिकारी यांच्याकडील बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. सदर निधी खर्च करताना १३ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर केलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच निधी खर्च करावा. मंजूर अनुदानापेक्षा जास्तीचे दायीत्व निर्माण करु नये. १३ व्या वित्त आयोगांतर्गत प्रत्यक्षपणे प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेतच निधी खर्च करण्याबाबत संदर्भ क्र.(१) च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना सर्व संबंधितांनी विचारात घ्याव्यात. तसेच, निधी खर्च करताना उपरोक्त नमूद दि.४.१२.२०१२ च्या शासन निर्णयात व या शासन निर्णयात दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुनच, निधी खर्च करावा. निधी विहित वेळेत खर्च न झाल्यास त्याची सर्व जबाबदारी अंतिमत: जिल्हाधिकारी यांची राहील.

३. वितरीत केलेला निधी, मागणी क्र.ओ-१०,४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, १०२ सामुहिक विकास, (००)(४१) १३ व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हा नाविन्यपूर्ण योजना (४५१५०८५२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) व ५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ च्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. निधीच्या खर्चाचे अंतिम उपयोगिता प्रमाणपत्र, आर्थिक /भौतिक अहवालही शासनास आणि महालेखापाल कार्यलयास पाठविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने, अनौप.संदर्भ क्र.५/वि.आ.क. दि.२१/१/२०१९ नुसार प्राप्त मान्यतेप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०२२५१५०७०२९६१६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.02.25 15:10:59 +05'30'

(वि. फ. वसावे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
४. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
५. महालेखापाल ½ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर
६. शासनाचे मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
८. विभागीय आयुक्त (पुणे, नाशिक,औरंगाबाद,नागपूर,अमरावती)
९. जिल्हाधिकारी (कोल्हापूर, सांगली,नाशिक,जळगांव,हिंगोली, जालना,बीड,लातूर,चंद्रपूर,गडचिरोली,अमरावती,बुलढाणा,वाशिम)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद कोल्हापूर,सांगली,नाशिक,जळगांव, हिंगोली(वाशिम,बुलढाणा,अमरावती,गडचिरोली,चंद्रपूर,लातूर,बीड,जालना,
११. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई
१२. जिल्हा नियोजन अधिकारी (कोल्हापूर, सांगली,नाशिक,जळगांव,हिंगोली, जालना,बीड,लातूर,चंद्रपूर,गडचिरोली,अमरावती,बुलढाणा,वाशिम)
१३. जिल्हा कोषागार अधिकारी (कोल्हापूर, सांगली,नाशिक,जळगांव,हिंगोली, जालना,बीड,लातूर,चंद्रपूर,गडचिरोली,अमरावती,बुलढाणा,वाशिम)
१४. निवड नस्ती का.१४८१-अ